# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.०३/०९/२०१९

## दि.०२/०९/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ६२३/१९,भादविक ३०७,३२६,३२३,५०४,१४३,१४७,१४८,१४९,महा.पो.का.क. ३७(१)१३५,क्रिमीनल लॉ अमेंन्डमेंट ॲक्ट क.३,७ |
| **फिर्यादी** | नितीन गायकवाड,वय-५५ वर्षे,रा.नवी खडकी,येरवडा,पुणे |
| **आरोपी** | १.तुषार ईश्वर काची,वय-२१ वर्षे,रा.स.नं.३,मदर तेरेसा नगर,गाडीतळ,येरवडा,पुणे २. आकाश सुनिल कांबळे,वय-२३ वर्षे,रा.सदर ३.सुजय कालीदास गीर,वय- १८ वर्षे,रा.सदर (अटक) १.विधींसंघर्षीत बालक,वय-१७ वर्षे,रा.म.हौ.बोर्ड,नागपूर चाळ, येरवडा,पुणे २.विधीं संघर्षीत बालक,वय-१७ वर्षे,रा.पर्णकुटी,येरवडा,पुणे (ताब्यात) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०१/०९/२०१९ रोजी रात्रौ १०/४५ वा.दिपक फर्टिलायझर कंपनीच्या समोरील जी.एस.टी. भवनाचे गेट जवळ,शास्त्रीनगर,येरवडा,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा मुलगा १.गौरव नितीन गायकवाड,वय-२१ वर्षे,रा.घर नं.३१९, नवी खडकी,येरवडा,पुणे व त्याचा मित्र २.उमेश रमेश देवकर,वय-२२ वर्षे,रा.वडार वस्ती,विश्रांत वाडी,पुणे यांना यातील नमुद इसम व विधींसंघर्षीत बालक यांनी क्षुल्लक कारणावरुन शिवीगाळ करुन,लोखंडी सत्तुरने गौरवच्या डोक्यावर वार करून,तसेच धारदार चाकुने गौरवला जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने त्याचे हातावर,पोटावर व पाठीवर वार केले. त्यावेळी उमेश हा मध्ये पडला असता,त्याचे हातावरही चाकुने वार करून,लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, आर.बी.गिरमकर ८८०५५७३७३३ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ७४७/१९,भादविक ३०७,५०६,३४ |
| **फिर्यादी** | मोहंमद मैनुल्ला शाहीदअली सिध्दीकी,वय-२६ वर्षे,रा.शिवनेरीनगर,कोंढवा-खुर्द,पुणे |
| **आरोपी** | एकुण तीन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०१/०९/२०१९ रोजी २०/१५ वा.ते २०/४५ वा.चे दरम्यान ओव्हीओ लश लाईफ सोसायटी कडनगर उंड्री,पुणे येथे मेनगेट जवळ |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे नमुद ठिकाणी वॉचमनचे काम करीत असुन,ते डयुटीस असताना,यातील नमुद इसमांनी त्यांचे दुपारी व संध्याकाळी कामाच्या वादातुन झाले भांडणाचे कारणावरून, फिर्यादी यांचे सहकारी वॉचमन यांना मारहाण केली. त्यानंतर परत घटनास्थळी येवुन लोखंडी रॉडने फिर्यादी यांचे डोक्यात मारहाण करून,"मै तुम्हे जिंदा नही छोडुंगा मार दुंगा" असे म्हणुन फिर्यादीस जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने बांबुने व रॉडने त्यांचे डाव्या हाताला, डाव्या पायाला मारहाण केली. त्यावेळी सदर ठिकाणी कर्नल हे घटनास्थळी येवुन त्यांना "इसे मत मारो,नहीं तो मै गोली चलाऊंगा" असे म्हणत असताना सुध्दा,सदर इसमांनी फिर्यादीस मारहाण चालु ठेवल्याने,कर्नल यांनी त्यांचेकडील पिस्टलने (बंदुकीने) हवेत एक गोळी फायर केल्याने ते तेथुन पळुन गेले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एच.सी.शिंदे ९९२२९५५४७० |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | शिवाजीनगर पो स्टे ३९१/१९,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | ज्ञानेश्वर चालाक,वय-२२,रा.आळंदी,पुणे |
| **आरोपी** | १.अमित सुनिल शिवशरण,वय-२०,रा.सुभाषनगर,बोपोडी,पुणे (अटक) व इतर दोन इसम |

| | |
|---|---|
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०२/०९/२०१९ रोजी सकाळी ०५/३० वा.पुणे महानगर पालीका शेजारील शिवाजी महाराज पुलावर,शिवाजीनगर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे सदर ठिकाणाहुन पायी जात असताना,नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन गाडी थांबवुन,आमचे घरी प्रॉब्लेम झाला आहे,एक फोन लावता का असे म्हणुन,फिर्यादी यांचे हातातील १०,०००/- रु किंचा मोबाईल हिसकावुन घेवुन पळुन गेले आहेत. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. प्रकाश मुतनाळे ९७६३९३४९२६ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे ४८९/१९,भादविक ३९४,५०६,३४ |
| **फिर्यादी** | सतिषचंद वर्मा,वय-२८ वर्षे,रा.कोंढवा रोड,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०१/०९/२०१९ रोजी १६/३० वा.सेंट पेट्रीक स्कुल समोर सार्वजनिक रोडचे बाजुला |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यातील फिर्यादी हे त्यांचे मित्र यांचेसह खडकी येथील काम संपवुन त्यांचे राहते घरी जाण्यासाठी एम्प्रेस गार्डन रोडने सेंट पेट्रीक स्कुल समोर सार्वजनिक रोड येथे आले असता,यातील नमुद दोन अनोळखी इसमांनी पाठीमागुन फिर्यादी यांचेजवळ येवुन,त्यांना आमचे अंगावर का थुंकला,गाडी साईडला घे असे म्हणुन फिर्यादी यांना मारहाण करुन त्यांना दुखापत करुन,फिर्यादी यांचे खिशातील रोख २७,०००/- रुपये जबरदस्तीने जबरी चोरी करून नेले आहेत. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. ए.ए.डोंबाळे ९८२३५५६७१३ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे ३२८/१९,भादविक २७९,३०४(अ),मोव्हेॲक्ट १८४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | ए.एस.किटे, पो.ना. वारजे पोलीस स्टेशन,पुणे शहर |
| **आरोपी** | ट्रॅव्हल्स बस क्र.एम.एच.२४.एफ.८९८९ हिचेवरील वाहन चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०१/०९/२०१९ रोजी रात्रौ २१/१५ वा.मुंबई-बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग क्र.४ हिचेलगत असना-या कावेरी हॉटेलचे समोरील सर्व्हिस रोडवर |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील ट्रॅव्हल्स बस ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी मोटार सायकलस्वार प्रमोद सिताराम कासरुंग,वय-३२ वर्षे.रा.१०५,पी.एम.सी.कॉलनी,राजेंद्रनगर,पुणे यांस पाठीमागुन जबर ठोस मारून,त्यांचे डोक्यास,पाठीला,गुडग्याला ठिक-ठिकाणी गंभीर जखमी करून,त्यांचे मुत्युस कारणीभुत झाला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. ए.डी.येवले ८८८८८०२२५२ |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चंदननगर पो स्टे ३३५/१९,भादविक २७९,३०४(अ),मोव्हे.१८४,१३२(१)(क), ११९/१७७ |
| **फिर्यादी** | सुनिलकुमार यादव,वय-२०,रा.होम स्टाईल,शो-रुम,खराडी,पुणे |
| **आरोपी** | डंपर नं.एमएच/१२/क्युडब्लु/९९०२ हिचेवरील चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०२/०९/२०१९ रोजी सकाळी ११/४० वा.मुंढवा बायपास रोड,फाईन फर्निचर जवळ, रिलायन्स मार्ट खराडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील डंपर हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी फिर्यादी व त्यांचा मित्र नफीज अब्दुल शेख,वय-३२,रा.होम स्टाईल शो-रुम,खराडी,पुणे यांचे मोटार सायकलला पाठीमागुन जबर ठोस मारून,फिर्यादी यांना किरकोळ जखमी करून,नफीज शेख यांना गंभीर जखमी करून नफीज याचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. के.व्हि.वराळ ९५०३५३४०० |

७

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ७४८/१९,भादविक ३५३,५०४ |
| **फिर्यादी** | रोहित कर्णे, पोलीस शिपाई, कोंढवा पोलीस स्टेशन,पुणे शहर |
| **आरोपी** | एक पुरूष,रा.कृष्णानगर वसाहत,मोहमंदवाडी,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०२/०९/२०१९ रोजी ११/१५ वा.ते १२/०० वा.कृष्णानगर वसाहत,मोहमंदवाडी,पुणे सर्व्हे नं. ४०/०२,मोहमंदवाडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व पोलीस शिपाई शिरसाठ असे उंड्री बिट मार्शल डयुटीवर असताना,त्यांना ११/०० वा.नियंत्रण कक्ष यांचा कृष्णानगर येथील भांडणाचा कॉल प्राप्त होताच,फिर्यादी व पोलीस शिपाई,शिरसाठ सदर ठिकाणी गेले असता,नियंत्रण कक्षाने कॉल करून सांगितले की,त्याचे शेजारी राहणारा इसम हा त्याचे आईला शिवीगाळ करुन,गाडीचे नुकसान केले आहे. त्यावेळी फिर्यादी यांनी त्यास तक्रार देण्यासाठी उंड्री चौकीला जाण्यास सांगितले. त्यावेळी सदर इसमाने फिर्यादी यांना अपशब्द वापरून,धक्का-बुक्की करीत असताना,फिर्यादी यांनी मदतीसाठी चौकीचा व तपास पथकाचा स्टाफ यांना बोलाविले असता,चौकीचा स्टाफ आल्यावर पुन्हा सदर इसमाने फिर्यादी व पो.शि.शिरसाठ यांना अपशब्द वापरून,धक्का-बुक्की करून,फिर्यादी हे सरकारी काम करित असताना,ते करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा निर्माण केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. ए.के.चाऊस ८८८८९७४३४३ |

८

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | फरासखाना पो स्टे ३०९/१९,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-५०,रा.क्विन्स गार्डन,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात व्यक्ती (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०२/०९/२०१९ रोजी सकाळी ११/०० वा.कसबा पेठ रोड,पुणे येथील गणपती स्टॉलचे समोर सार्वजनिक रोडवर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे नमुद ठिकाणी गणपती मुर्ती खरेदी करीत असताना,कोणीतरी अज्ञात व्यक्तीने गर्दिचा फायदा घेवुन,फिर्यादी यांना धक्का देवुन,त्यांचे नकळत त्यांचे जवळील हॅण्ड बॅगवर ब्लेड मारून,ती कापुन छोटया पर्स मधील रोख १० हजार रूपये व इतर कागदपत्रे चोरी करून नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.हवा. येळे ९८५००४९३८२ |

९

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतु:श्रृंगी पो स्टे ७७८/१९,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-५२ वर्षे,रा.काकरे चाळ,किसननगर,वागळे ईस्टेट,जि.ठाणे |
| **आरोपी** | अनोळखी रिक्षाचालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३१/०९/२०१९ रोजी ०९/२५ वा. यशदा कार्यालयाचे समोर रोडवर बाणेर रोड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे ॲटो रीक्षामधुन त्यांचे मुददेमाल असणारे प्रवासी बॅगसह प्रवास करीत असताना,नमुद ठिकाणी फिर्यादी हे रिक्षा चालकाचे भाडे देण्यासाठी चेंज रक्कम घेत असताना,सदर अनोळखी रिक्षाचालकाने फिर्यादी यांचेकडील मुददेमाल असणारी बॅग त्यामधील दोन मोबाईल,कॅमेरा,लॅपटॉप,एटीएम कार्ड,महत्वाची कागदपत्रे व रोख ८५,०००/- रूपये रक्कम असा एकुण २,७७,०००/- रुपये किचे बॅगेसह चोरी करुन रिक्षातुन पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.डी.दराडे ९४२०६६७७८९ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**